ePaper
| वर्ष - 7 | अंक - 5 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | सोमवार दि. 1 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## महाविकास आघाडीचे आज शक्तिप्रदर्शन; उद्धव ठाकरे हे मुख्य वक्ते






# फलकधारकांना न्यायालयाची चपराक!

## पिंपरीतील बेकायदा जाहिरात फलकधारकांना 2 वर्षांची रक्कम भरण्याचा उच्च न्यायालयाचा आदेश

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील ४३४ बेकायदा लोखंडी जाहिरात फलकधारकांनी (होर्डिंग) प्रत्यक्ष मोजमापानुसार मागील दोन वर्षांची रक्कम दोन आठवड्यांत महापालिकेत भरावी. फलक कायदेशीर करण्यासाठी नव्याने अर्ज करावेत, असा आदेश देत मुंबई उच्च न्यायालयाने फलकधारकांची याचिका निकाली काढली.**





शहरातील ४३४ बेकायदा जाहिरात फलक काढण्याची नोटीस महापालिकेने फलकमालकांना बजावली होती. मात्र, फलक काढण्यास नकार देत या नोटिशीविरोधात पिंपरी-चिंचवड जाहिरात असोसिएशनने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने हे फलक 'जैसे थे' ठेवण्याचा आदेश दिला होता. किवळेतील बेकायदा फलक कोसळून झालेली दुर्घटना महापालिकेने न्यायालयाच्या निदर्शनास आणून देत तत्काळ सुनावणी घेण्याची विनंती केली. त्यानुसार २५ एप्रिल रोजी सुनावणी पार पडली. बेकायदा फलकधारकांनी प्रत्यक्ष मोजमापानुसार मागील दोन वर्षांची रक्कम दोन आठवड्यांत पालिकेत भरावी. Zसर्व फलकधारकांनी नव्याने अर्ज करावेत. अर्जात काही त्रुटी असतील, तर पालिकेने आठ दिवसांत कळवाव्यात. फलकधारकांनी १५ दिवसांत त्रुटींची पूर्तता करावी. अर्जदाराने कागदपत्रांची पूर्तता न केल्यास कारण स्पष्ट करून अर्ज नाकारण्यात यावा. अंतिम अर्ज मंजूर झाल्यानंतर २०२३-२४ ची मागणी आणि पाचपट शुल्क १५ दिवसांत भरावे. मागणी रक्कम न भरल्यास परवाना मागणीचा अर्ज रद्द करावा, अर्ज नाकारण्यात आल्यानंतर दहा दिवसांत फलक स्वतःहून काढून घ्यावेत अन्यथा महापालिकेने काढावेत, असा आदेश न्यायालयाने दिला आहे. जाहिरात असोसिएशन आणि महापालिकेने परस्पर संमतीने सादर केलेला मसुदा न्यायालयाने स्वीकारला. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचा आदेश दिला.



### फलकांचे आकारमान तपासणार

» शहरातील ४३४ बेकायदा फलकांचे आकारमान तपासण्यात येणार आहे. यासाठी आकाशचिन्ह व परवाना विभागाने सहा पथकांची नियुक्ती केली. दोन दिवसांत त्याचा अहवाल मागविला आहे. तसेच परवानगी दिलेल्या फलकांचीही तपासणी करून सात दिवसांत स्वतंत्र अहवाल मागविला आहे.

> "न्यायालयाने यापुढील संपूर्ण प्रक्रिया कालबद्ध पद्धतीने राबविण्याचा आदेश दिलेला आहे. या निर्णयाचे पालन करणे महापालिका व फलकधारकांना बंधनकारक आहे. न्यायालयाच्या निर्णयाची सविस्तर माहिती फलकधारकांना दिली आहे. यापुढील संपूर्ण कार्यवाही ही न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येईल.
>
> -जितेंद्र वाघ अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

त्यामुळे योग्य पद्धतीने उभारलेले बेकायदा फलक नियमित होऊ शकतील. फलक नियमित करताना शासनाच्या ९ मे २०२२ रोजीच्या धोरणाची अंमलबजावणी करावी लागणार आहे.

न्यायालयाच्या आदेशाची माहिती देण्यासाठी अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांनी सर्व फलकधारकांची शुक्रवारी (दि. २८) बैठक घेतली. आकाशचिन्ह व परवाना विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख, परवाना निरीक्षक, फलकधारक उपस्थित होते. महापालिकेने फलकधारकांना न्यायालयाच्या निर्णयाची सविस्तर माहिती दिली. याचबरोबर कायदेशीर व बेकायदा फलकधारकांनी सहा मेपर्यंत संरचना स्थिरता प्रमाणपत्र सादर करावे. सादर न केल्यास दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.

# पिंपरीत कोयता गँगचा धुडगूस!

## मेडिकल दुकानात पाण्याचे पैसै मागितले, केले धक्कादायक कृत्य

। पिंपरी। महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवड शहरात कोयता गँगने पुन्हा एकदा डोके वर काढल्याचे पहायला मिळत आहे. पिंपरी परिसरात चोवीस तास सुरू असणाऱ्या एका मेडिकल शॉपमध्ये शिरून सहा जणांच्या टोळक्याने एकावर कोयत्याने वार केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पिंपरी पोलिसांकडून सात ते आठजणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेबाबत अधिक माहिती अशी की, पिंपरी परिसरात असलेल्या मेडिकल दुकानामध्ये काही तरुण आले होते. त्यांनी मेडिकल दुकानातून पाण्याची बाटली घेतली. त्यानंतर दुकानात काम करणाऱ्या मुलाने



त्यांच्याकडे पैसे मागितले. मात्र त्या तरुणांनी, तुला पैसे पाहिजेत का, थांब तुला खल्लासच करतो, असे म्हणत त्याच्यावर कोयत्याने वार केले. पाण्याच्या बाटलीचे पैसे मागितल्यावरून ही तोडफोड केल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर वायसीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तसेच त्या टोळक्याने मेडिकल दुकानाची मोठ्या प्रमाणावर तोडफोड देखील केली आहे.

### मध्यरात्री सात ते आठ वाहनांची तोडफोड

» या घटनेने पिंपरी परिसरातील व्यवसायिक मोठ्या दहशतीखाली आले आहेत. या घटनेने पिंपरी परिसरात पुन्हा एकदा कोयता गँगची चर्चा सुरू झाली आहे. तसेच याच गँगने मध्यरात्री सात ते आठ वाहनांची तोडफोड केली आहे. पोलिसांकडून या प्रकरणी नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोयता गँगमुळे व्यापाऱ्यांबरोबरच सर्वसामान्य नागरिकांना देखील याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे पोलिसांनी या दहशत पसरवणाऱ्या व्यक्तींच्या मुसक्या आवळून त्यांना शिक्षा करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

# पुण्यात नदी बचावसाठी चिपको आंदोलन!

## नदी सुधार प्रकल्पाला पर्यावरणप्रेंमींचा विरोध, मनसे नेते वसंत मोरे झाले मोर, लूक आणि पोस्ट चर्चेत

। पुणे।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) फायर ब्रँड नेते वसंत मोरे हे नेहमीच चर्चेत असतात. काही दिवसांपूर्वी त्यांनी एका पेन्शनसाठी २१ वर्षे सरकारदरबारी खेटे मारणाऱ्या आजींना पेन्शन मिळवून दिली. त्यामुळे त्यांच्या कामाचे चांगले कौतुक झाले होते. आता पुन्हा एकदा वसंत मोरे चर्चेत आले आहेत. नदी बचाव करण्यासाठी चिपको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात अनेक पर्यावरण प्रेमी सहभागी झाले होते. त्यात वसंत मोरे हे देखील सहभागी झाल्याचे पाहायला मिळाले. मात्र त्यांच्या चर्चा झाली त्यांच्या पेहेरावाची. या आंदोलनात सहभागी होत त्यांनी चक्क मोराचा पेहराव केला होता.**



पुण्यातील पर्यावरण प्रेमी हजारोंच्या संख्येने यामध्ये सहभागी झाले होते. संभाजी उद्यान येथून ही रॅली सुरू झाली झाली. जंगली महाराज रस्त्यावरील पादचारी मार्गाने ती नदीपात्राच्या मार्गे खिल्लारे वस्तीपर्यंत आली.

यावेळी पुणे महानगरपालिकेच्या वतीने सुरू असलेल्या नियोजित नदी सुधार प्रकल्पाला पर्यावरण प्रेमींनी विरोध केला.

नदी सुधार प्रकल्पामुळे नदीपात्रातील अनेक झाडे तुटणार आहेत. त्यामुळे पर्यावरणाची हानी होणार असल्याने पर्यावरण प्रेमींनी ही रॅली काढली असल्याचे सांगितले.

### प्रशासनाला दिला इशारा

**याबाबत वसंत मोरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत ही माहिती दिली आहे. या पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'आम्ही काहीही करू शकतो या आविर्भावात कोणत्याही राजकीय पक्षाने राहू नये... हे पुणेकर आहेत सकाळच्या नाष्ट्याला जेव्हा ते घरातून बाहेर पडतात तेव्हाच ठरवून बाहेर पडतात आज मिसळ बेडेकरांची खायची की श्री वाल्यांची, तेव्हा पुणेकरांचा जास्त नाद करू नका. नाहीतर या नदी सुधार प्रकल्पावरून ठरवतीलही की यावेळी मतदान कोणाला करायचे'. अशा पोस्टद्वारे वसंत मोरे यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे.**



# उन्हाळ्यामुळे रसाळ फळांना मागणी

पुणे : गेल्या काही दिवसांत उन्हाचा कडाक्याची तीव्रता काहीशी सौम्य झाली आहे. मात्र उकाडा सहन करावा लागत आहे. त्यामुळे रसाळ फळांच्या मागणीत वाढ झाली आहे.

उन्हाळ्यामध्ये रसदार फळांना पसंती दिली जाते. तसेच शरीराचे तापमान राखण्यासाठी अनेकांचा कल ज्यूस पिण्याकडे असतो. त्यामुळे सध्याच्या उन्हाळ्याच्या काळात फळांना, त्यातही रसदार फळांना मागणी वाढली आहे. त्यातही खरबूज आणि कलिंगडांना मागणी कायम आहे. उन्हाळ्यामुळे लिंबाच्या प्रतवारीवर परिणाम झाला आहे. लिंबे रसदार नसल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

केरळमधून ६ ट्रक अननस, संत्री २ टन, मोसंबी २५ टन, डाळिंब ३० टन, पपई ५ टेम्पो, लिंबे दोन हजार गोणी, कलिंगड ३० टेम्पो, खरबूज २५ टेम्पो , पेरू ६०० प्लॅस्टिक जाळी (क्रेट्स), चिकू दीड हजार डाग तसेच हापूस आंबा तीन हजार पेटी अशी आवक झाली. कर्नाटकातील दोन डझनाच्या आंब्याची खोकी तसेच करंड्यांची आवक झाल्याचे फळव्यापाऱ्यांनी सांगितले.

# प्रेरणादायीः शेतकरी कुटुंबातील चारही बहीण-भावांची पोलीस दलात निवड

## हलाखीची परिस्थिती, वडिलांनी मुलांसाठी पोलीस भरतीचं स्वप्न पाहिलं

।जुन्नर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जुन्नर तालुक्यातील वडगाव आनंद येथील एका शेतकरी कुटुंबातील चारही बहीण - भावांची पोलीस दलात निवड झाली आहे. चारही मुलांनी पोलीस दलात जाण्याचं स्वप्न बापाने पाहिलं होतं आणि त्या चारही मुलांनी वडिलांचं स्वप्न पूर्ण करून दाखवलं आहे. वडिलांचे स्वप्न पूर्ण झाल्याचा त्यांना अतिशय आनंद आहे. दिपक गाडेकर, अंकिता गाडेकर, सारिका गाडेकर आणि आशा गाडेकर अशी या चार भावंडांची नावं आहेत.**



जुन्नर तालुक्यातील वडगाव आनंद परिसरात विजय गाडेकर यांचं कुटुंब राहतं. त्यांचा मुळचा व्यवसाय शेती आहे. घराची परिस्थिती हलाखीची... परिस्थितीमुळे आपल्याला शिकता आलं नाही, पण आपल्या मुलांना आपण सरकारी नोकरीत म्हणजे पोलीस खात्यात भरती करायचं असं त्यांचं स्वप्न होतं. त्यानुसार त्यांनी चारही मुलांना पाठींबा देत पोलीस भरतीच्या तयारीसाठी सह्याद्री नावाच्या करिअर अकॅडमीमध्ये पाठवलं.

त्या करिअर अकॅडमीचे शिक्षक मयूर डुंबरे आणि अनिकेत घोडेकर यांनी देखील मेहनत घेत त्यांना इथपर्यंत पोहचण्यास मदत केली. वडिलांचं स्वप्न पूर्ण झाल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आहे. या चारही भावंडांची महाराष्ट्र पोलीस दलात नियुक्ती झाली आहे. या चारही भावंडांना पहिल्यापासूनच शालेय जीवनात अभ्यासाची गोडी होती. आपण काहीतरी करू शकतो अशी जिद्दही त्यांना होती. त्यांचं शालेय शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडगाव आनंद, उच्च शिक्षण बाळासाहेब जाधव महाविद्यालय आळे या ठिकाणी पूर्ण केलं.

सर्वात आधी आशा गाडेकर यांची २०१४ साली यांची पुणे शहर पोलीस दलात नियुक्ती झाली. त्यानंतर सारिका गाडेकर यांची २०११ साली पुणे शहर पोलीस दलात नियुक्ती झाली. या दोघी देखील विवाहित असून सध्या त्या पुण्यामध्ये स्थायिक आहेत.

### ग्रामस्थांकडून चारही भावंडांचं कौतुक

**एकामागे एक चारही भावंडांनी महाराष्ट्र पोलीस दलामध्ये भरती होऊन एक आदर्श समाजापुढे निर्माण केला आहे. आई-वडिलांच्या अथक कष्टाचं चीज या चारही मुलांनी केलं आहे. जुन्नर तालुक्यातल्या वडगाव आनंद या ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या या कुटुंबाचं नाव त्यांनी मोठं केलं. तसंच आपल्या आई वडिलांना अभिमान वाटेल अशी कामगिरी केली आहे. सर्व परिसरातून आणि वडगाव आनंद ग्रामस्थांकडून चारही भावंडांचं कौतुक केलं जात आहे.**

# पथनाट्यातून पाणी बचतीचा संदेश!

## पानी रे पानी तेरा रंग कैसा?: उन्हाळ्यात भेडसावणाऱ्या पाणी समस्येवर प्रकाश टाकणारे पथनाट्य

|पिंपरी |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**दिलासा संस्था, मानवी हक्क आणि संरक्षण जागृती या सामाजिक संस्थांच्या वतीने उन्हाळ्यात भेडसावणाऱ्या पाणी समस्येवर प्रकाश टाकणारे (PIMPRI) "पानी रे पानी तेरा रंग कैसा?" हे पथनाट्य रविवार, दिनांक 30 एप्रिल 2023 रोजी सादर करून पिंपळे गुरव येथील राजमाता जिजाऊ उद्यानात जनतेचे प्रबोधन करण्यात आले.**



दिलासा संस्थेचे अध्यक्ष सुरेश कंक, मानवी हक्क संरक्षण आणि जागृती या संस्थेचे शहराध्यक्ष आण्णा जोगदंड, सुभाष चव्हाण, नंदकुमार कांबळे, संगीता जोगदंड, मुरलीधर दळवी, शामराव सरकाळे यांनी पथनाट्याच्या माध्यमातून पाणी बचतीचे महत्त्व विषद केले. वाढत्या उन्हाळ्यात 'पाणी जपून वापरावे!' ,

'आज जल है तो कल हम है!' , 'थेंब थेंब पाणी वाचवा!' , 'पाणी वाचवण्याचा ठेवा ध्यास, मगच होईल आपला विकास!' , 'पाण्याचे करा संरक्षण तरच वसुंधरेचे होईल रक्षण!' अशी घोषवाक्य म्हणत जनजागृती करण्यात आली.



### पाणी बचतीची घेतली सामूहिक शपथ...

**पथनाटयामध्ये सुरेश कंक, आण्णा जोगदंड, शामराव सरकाळे, संगीता जोगदंड, मुरलीधर दळवी, नंदकुमार कांबळे, सुभाष चव्हाण यांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी श्रीकांत चौगुले, डॉ. पी. एस. आगरवाल, प्रदीप गांधलीकर, गजानन धाराशिवकर, प्रताप साबळे, अशोकमहाराज गोरे, जयश्री गुमास्ते, एकनाथ उगले, सुंदर मिसळे, दिलीप कांबळे, बाळासाहेब देवकर, गणेश गडगे, अरविंद मांगले, प्रमोद माने, श्रावणी अडागळे, राजू कुंभार, शोभा माने, प्रकाश बंडेवार आणि हास्य क्लब सदस्य उपस्थित होते. पथनाट्य झाल्यावर पाणी बचतीची सामूहिक शपथ आण्णा जोगदंड यांनी उपस्थित नागरिकांना दिली.**

संगीता जोगदंड आणि आण्णा जोगदंड या दांपत्याने पाण्यासाठी झुंबड झाल्यावर होणाऱ्या भांडणाचा प्रसंग कळशी, हंडा घेऊन सादर केला. कवी शामराव सरकाळे यांनी अंगावरील कपड्यांवर पाणी बचतीचे संदेश लिहून उपस्थितांचे लक्ष वेधले.

वसुंधरा पर्यावरण प्रतिष्ठान पिंपरी-चिंचवड शहराचे अध्यक्ष गुणवंत कामगार तानाजी एकोंडे या प्रसंगी म्हणाले की, "सध्या आपल्याला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणात 37 टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला आहे.

सूर्य आग ओकत आहे. कडक उन्हाळ्यामुळे धरणातील पाण्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होत आहे.(PIMPRI) त्यामुळे पाणीसाठा झपाट्याने कमी कमी होत आहे. त्याचबरोबर दिवसेंदिवस शहराची लोकसंख्या वाढत आहे. गरजेपेक्षा कमी पाणी उपलब्ध आहे.

यासाठी सर्व नागरिकांनी पाणी जपून वापरायला शिकले पाहिजे. गळके नळ बदलावेत, किमान उन्हाळ्यात तरी गाड्या धुवू नयेत, पाण्याचा वापर काटकसरीने करावा. पिण्याच्या पाण्याचा अपव्यय करू नये. पाणी जीवन आहे!" असे विचार मांडले.

---

# सायन्स पार्कमध्ये शतकपूर्ती व्याख्यानाचे आयोजन

## पिंपरी-चिंचवड सायन्य पार्क फेब्रवारी 2013 पासुन कार्यरत

|पिंपरी |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पीसीएमसी सायन्स पार्क तर्फे आज 1 मे रोजी शतकपूर्ती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. हे व्याख्यान सायन्स पार्क येथे होणार असून या व्याख्यानासाठी प्रवेश विना शुल्क आहे.**




पिंपरी-चिंचवड सायन्य पार्क फेब्रवारी 2013 पासुन कार्यरत असून, गेल्या दहा वर्षात 22 लाखाहून आधिक राज्यातील व विविध परराज्यातील, विद्यार्थी शिक्षकांसह नागरिकांनीही या सुविधेचा लाभ घेतला आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सूविधेबरोबर सायन्य पार्क दवारे विज्ञान कार्यशाळा, विज्ञान व्याख्यान दुर्बिणीदवारे आकाश दर्शन व अन्य उपक्रम राबविले जातात.

तसेच दर महिन्याला पहिल्या तारखेस नामवंत व्याख्यातेचे जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनात उपयोगी असे पर्यावरण सुरक्षा जलसंवर्धन व आरोग्य इत्यादी विषयावर व्याख्यान एप्रिल 2015 पासून अखंडपणे सुरु आहे. व्याख्यानानंतर श्रोत्यांना मंत्रमुग्ध करतील अशा नवोदित व प्रतीश यश कलाकारांदवारे शास्त्रीय सुगम संगीताचे सादरीकरण केले जाते. तसेच उपक्रमाचे प्रथम षुष्म खगोल अभ्यासक , लेखक डॉ . प्रकाश तुपे यांच्यादवारा गुंफण्यात आलेले होते.

### विविध क्षेत्रातील मान्यवराचे सहकार्य

**2015 पासून अखंडपणे हा उपक्रम मध्यंतरी कोरोना काळात लॉकडाऊन कालवधीतही ऑनलाइन सुरु ठेवण्यात आला होता. तसेच असा हा उपक्रम अखंडितपणे सुरु राहावा म्हणून मराठी विज्ञान परिषद पुणे सायन्य पार्क यांच्यामार्फत संयुक्तपणे आय़ोजन करण्यात आले. यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवराचे सहकार्य लाभत आहे. प्रेक्षकाच्या मागणी, रुचीनुसार व्याख्यान व संगीत कार्यक्रमात नाविन्य आणण्यासाठी सायन्स पार्क संस्थापक प्रवीण तुपे सतत प्रयत्नशील आहेत.**

दि. 1 मे 2023 रोजीचे शतकपूर्वी व्याख्यान संस्थापक आंनद चोरडीया, द इको फॅक्टरी फाउंडेशन पुणे यांच्यादवारा शाश्वत विकास सहज शक्य कसा यावर आपले विचार श्रोत्यांपुढे मांडणार आहेत. (CHINCHWAD) व्याख्यानानंतर संगीता, संध्या, संदीप उबाळे, स्वप्नजा लेले यांच्या सुप्रसिध्द मराठी गीतांचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमाचा प्रवेश विनामूल्य आहे.

## संपादकीय »

### फेक की नेक?

***सरकार जेव्हा 'फेक न्यूज' नियंत्रणात आणू म्हणते तेव्हा त्याचा खरा अर्थ 'न्यूज नियंत्रण' असाच असतो. 'फेक न्यूज' नियंत्रणामागच्या सरकारच्या हेतूवर शंका घ्यावीच लागते..***

'मानवाचे पाऊल आणि वाळवंटाची चाहूल' अशा अर्थाचा (आफ्टर मॅन, द डेझर्ट) एक वाक्प्रचार आहे. सद्य:स्थितीत त्यात मानवाच्या जागी 'सरकार' या शब्दाचा अंतर्भाव केल्यास बाकी सारे तंतोतंत लागू पडते. ताजा संदर्भ फेक न्यूज रोखण्यासाठी सरकारतर्फे सुचवला गेलेला उपाय. फेक न्यूज म्हणजे ठरवून, जाणूनबुजून पसरवली जाणारी असत्य बातमी. माहिती तंत्रज्ञानाची औरस निर्मिती असलेल्या समाजमाध्यमांचे अनौरस अपत्य म्हणजे हे फेक न्यूज प्रकरण. यात केवळ असत्य, भ्रामक, कपोलकल्पित अशा प्रकारच्या बातम्या प्रसृत केल्या जातात असे म्हणणे हा एका अर्थी सत्यापलाप ठरतो. फेक न्यूज हा प्रकार मुद्दाम भावना भडकावण्यासाठी, ठरावीक समाज, ठरावीक माध्यमे, ठरावीक व्यक्ती आदींविरोधात प्रक्षोभ निर्माण व्हावा या उद्देशाने केला जातो. हे असे करणारे कागदोपत्री एकटे-दुकटे भासत असले तरी ते सर्व एका संघटित प्रचार यंत्रणेचे घटक असतात. सर्वसामान्य व्यक्तींच्या ठायी नीरक्षीरविवेक असतोच असे नाही आणि असला तरी त्यांस त्या विवेकाच्या आधारे विचार करण्याची गरज वाटतेच असे नाही. त्यात गल्लोगल्लीच काय घरोघरी तयार झालेले 'व्हॉट्सॲप विद्यापीठा'चे कुलगुरू! त्यामुळे अलीकडच्या काळात 'फेक न्यूज' ही एक मोठीच डोकेदुखी बनलेली आहे यात शंका नाही. तथापि या डोकेदुखीवर सरकार हा इलाज असूच शकत नाही. पण आपल्या सत्ताधाऱ्यांना हे तत्त्व मान्य नसावे. आकाशातील चंद्रसूर्यतारे वगळता आपण सर्व काही हाताळू शकतो अशा काहीशा भ्रमामुळे सरकारने हे 'फेक न्यूज' निवारणाचे कार्य हाती घेतले असून त्यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्याचे सूचित केले आहे. एका विषप्रयोगावर ज्याप्रमाणे दुसरे विष हा उतारा असू शकत नाही; त्याप्रमाणे 'फेक न्यूज' कोणती हे ठरवण्याचे अधिकार सरकारहाती राहू शकत नाहीत. याचे कारण सरकार हेच स्वत: 'फेक न्यूज'चे निर्मिती केंद्र असू शकते, हे कसे नाकारणार? ज्याप्रमाणे एकाचा 'प्रचार' हा दुसऱ्यासाठी 'अपप्रचार' असू शकतो त्याचप्रमाणे एकाची 'न्यूज' दुसऱ्यासाठी 'फेक न्यूज' असू शकते हे मान्य करण्यास अवघड असले तरी सत्य आहे.

# साहित्य संमेलनाचा 'अमळनेरी' आदर्श...!




"अर्वाचीन मराठी साहित्यातील असे कोणते पुस्तक हजारो खेड्यांतून गेले? आमचे सारे साहित्य शहरी असते. शहरातील काही सुशिक्षितांसाठी असते. पुस्तकाच्या हजार प्रती खपल्या म्हणजे डोक्यावरून पाणी गेले असे वाटते. पुस्तके का खपत नाहीत? लोकात दारिद्र्य आहे, अज्ञान आहे, पुस्तके महाग आहेत, ती समजायला जड जातात, जनतेच्या जीवनाशी त्यांचा संबंध नसतो, खपविण्याचीही नीट व्यवस्था नसते, प्रामाणिक पुस्तके खपविणारे मिळत नाहीत. अशा अनेक अडचणी आहेत. त्यामुळे मराठी साहित्य समृद्ध होत नाही."... ही वाक्ये आहेत साने गुरुजींच्या 'गोड निबंध, भाग तिसरा' या पुस्तकातील. साहित्याच्या शहरी तोंडवळ्यामुळे ग्रामीण साहित्याचे कसे न भरून निघणारे नुकसान होत आहे, हे ज्या साने गुरुजींनी अतिशय पोटतिडिकीने आपल्या पुस्तकात मांडले, खुद्द त्यांच्याच कर्मभूमीत ९७ व्या साहित्य संमेलनाचा मांडव येत्या जानेवारीत उभारला जाणार आहे. साहित्य महामंडळाने गुरुजींचे हे विचार वाचले की नाहीत माहीत नाही. पण, कळत – नकळतपणे का होईना महामंडळाकडून गुरुजींच्या तक्रारीचे निरसन मात्र घडणार आहे! बायडेनकाळात 'यूएसटीआर'च्या ऐवजी अमेरिकी व्यापार मंत्रालयाचे महत्त्व वाढले आहे. हे मंत्रालय जगन्मान्य तात्त्विक भूमिकेनुसार नाही, तर अमेरिकेचे आर्थिक/ व्यापारी हित केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेऊ लागले आहे. अमेरिकन कंपन्या वा अमेरिकेत विकसित झालेले तंत्रज्ञान यांचे संरक्षण/ संवर्धन करणे, अमेरिकी कंपन्यांना चीनमध्ये गुंतवणुकीपासून परावृत्त करणे, प्रतिबंधित चिनी कंपन्यांची यादी प्रसिद्ध करणे नियमितपणे सुरू आहे. चीनच्या देशांतर्गत व बा अर्थव्यवहारांवर अपारदर्शीपणाचा आरोप गेली अनेक दशके होत आहे. व्याज आणि विनिमय दरांवर नियंत्रण, प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष सबसिडी, शिथिल पर्यावरणीय आणि कामगार कायदे करत देशाबाहेरील स्पर्धकांना नामोहरम केले जाते. चीनमध्ये खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील सीमारेषा धूसर असल्यामुळे अर्थप्रणाली अतिशय क्लिष्ट आहे. दडपण फारच वाढले की चीन थोडेफार नमते घेतल्याचा आभास करतो. पण तेवढेच.

देशातील शासनसंस्थेने त्यांची आर्थिक धोरणे, वर्गीकरण, आकडेवारी यांचे संहिताकरण करून ते सार्वजनिक केल्याशिवाय जाव्यास किंवा कोणत्याही राष्ट्रबाह्य संस्थेस ठोस आक्षेप घेताच येणारे नाहीत; कागदपत्रे, आकडेवारीनिशी आरोप सिद्ध करणे तर दूरच राहिले. या सगळ्यामुळे जाव्यासच्या दोन ताकदी, सामायिक नियमवही आणि तंटा निवारण, कमकुवत होऊ लागल्या आहेत. खान्देशातील छोट्याशा अमळनेरमध्ये साने गुरुजींनी 'विद्यार्थी' नावाचे मासिक प्रकाशित करून आपला वाङ्मयीन प्रवासाचा प्रारंभ केला होता. अमळनेर हे तालुक्याचे ठिकाण. संमेलनाच्या भव्यतेच्या तुलनेत येथील सुविधा तशा तोकड्याच. पण, साहित्य महामंडळाने आयोजनाचा बहुमान अमळनेरला दिला. तेही सातारा, औंदुबरसारखी निमंत्रणे हातात असताना. हे उत्तम संकेत आहेत. साहित्य सर्वंकष असले तरी आधी संमेलनांच्या प्राधान्यक्रमात मोठी शहरेच असायची. राज्याच्या शेवटच्या टोकावर वसलेल्या खुर्द आणि बुद्रुकमधल्या साहित्यप्रेमींपर्यंत ते केवळ छायाचित्रांमधूनच पोहोचायचे. संमेलनांचा पंचतारांकित 'पिंपरी चिंचवड पॅटर्न' बघून संमेलनाच्या मूळ प्रयोजनांवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जायचे. परंतु, आता हे चित्र बदलताना दिसत आहे.

**ती. माणेकदा, वैश्विकतावादी रवींद्रनाथ टागोर यांनी मध्ययुगात रुतलेल्या सुस्त भारताला आधुनिकतेकडे खेचून आणणारा रथ तयार केला.**

## वेगवान विनाश काळाची पदचिन्हे

क्षितिजे रुंदावणाऱ्या कालखंडात तुमच्या अभिव्यक्तीस आरंभ झाला. पौर्वात्य व पाश्चात्त्य विचार, नवता व परंपरा, निसर्ग व मानव, व्यक्ती व समाज, बुद्धी व भावना अशी अनेक द्वंद्व, प्राचीन काळापासून चालत आली आहेत. ती मिटवून त्यांच्यात अद्वैत साधण्याची किमया टागोर, गांधी व नेहरू यांनी साधली. टिकवून ठेवावी अशी भारतीय परंपरा कोणती? भारताने नवतेमधील कशाचा स्वीकार करावा? परंपरा आणि आधुनिकतेचा उत्तम संगम कसा घडवावा? याचा सखोल आणि चिकित्सक मागोवा घेऊन टागोर, गांधी व नेहरू यांनी संस्थांची रचना करीत विचार आणि कृती दिली. हे स्पष्ट करताना १९४६ साली नेहरू म्हणाले होते, "माझ्या नसानसांत भारतीयता भिनलेली आहे. भारताविषयीची माझी दृष्टी भाबडी असता कामा नये. कुठल्याही तर्काच्या कसोटीवर माझे विश्लेषण घासूनपुसून पाहता आले पाहिजे, असा माझा कटाक्ष आहे. त्यामुळे एखाद्या पाश्चात्त्याच्या तटस्थतेने मी भारताकडे पाहू शकतो. कठोर टीकाकाराच्या भूमिकेतून मी भारतीय परंपरेची शक्तिस्थळे आणि दुबळेपणा उमजून घेतला आहे. म्हणूनच भारताला आधुनिक रूपडे आणण्याची आस मला लागली आहे."

टागोर, नेहरू आणि तुमच्यातील बंध उलगडून सांगताना तुम्ही १९७० साली फोल्के इसक्सन यांना दिलेल्या मुलाखतीत म्हणाला होता, "मला नेहरू उत्तमरीत्या उमगले होते. त्यांच्यामध्ये उदारमतवाद, पाश्चात्त्य मूल्यांची विशिष्ट जाणीव आणि पौर्वात्य-पाश्चात्त्य मूल्यांचा मिलाफ होता. टागोरांचा आचार व विचार, मला समजत होता. तसंच नेहरूंची उक्ती व कृतींमागील विचार माझ्या ध्यानात येत होता. ते समजून घेण्यासाठी टागोरांचं आकलन असणं आवश्यक आहे. टागोर, नेहरू आणि मी असा हा त्रिकोण आहे. त्यातून टागोरांना वगळता येत नाही."

तुमच्यामुळे हे काळाचं भान येणं सोपं जात होतं. तुमचं घर व बाहेरचं जग उमगत चाललं होतं. अशी नेपथ्यरचना घेऊन अनेक पिढ्यांची तुमच्या 'अपू'सोबत खेड्यातून शहराकडे वाट व चाल सुरू झाली. तेव्हा मध्यमवर्गाची गाठ हातातोंडाशी होती. वाऱ्यापावसात कधीही कोसळू शकेल असं खिळपाटलेलं घर होतं. प्रत्येकाचं ताट नाममात्र भरलेलं असलं तरी लाचारी वा लबाडीचा स्पर्शही कटाक्षाने टाळला जात असे. परिस्थितीमुळं छातीवर दगड ठेवत मातीचा गंध व बंध बाजूला सारून शहराकडे जाणं भाग होतं. असुरक्षिततेची टांगती तलवार असली तरी कुतूहल, आशा व अपेक्षा यांतून ऊर्जा मिळत होती. उरात, संरजामी जगापासून सुटका झाल्याचा भाव होता. तुम्हाला कायमच कोणतीही घरं आरपार दिसत होती. 'घराच्या बाहेर आणि आत काय घडतंय? निरनिराळ्या घरांचे (व माणसांचे) स्व-भाव शब्दांविना चेहरे कसे अभिव्यक्त होतात?'

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सुधीर मुनगंटीवारांना मोठा धक्का!

## पोंभुर्णा बाजार समितीची सत्ता गमावली, मविआने फडकवला विजयाचा झेंडा

।चंद्रपूर । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**राज्यभरात बाजार समित्यांच्या निवडणुकीत मोठे उलटफेर पाहायला मिळाले आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील १२ बाजार समितींच्या निवडणुका पार पडल्या आहेत. शनिवारी नऊ बाजार समित्यांचा निकाल हाती आला होता. या निकालाने जिल्ह्यातील काही नेत्यांना मोठा धक्का दिला होता.**

आज जिल्ह्यातील पोंभुर्णा,गोंडपिपरी, भद्रावती या तीन बाजार समितीची मतमोजणी पार पडली. मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या क्षेत्रातील पोंभुर्णा बाजार समितीत महाविकास आघाडीने मोठे यश मिळवले आहे. भाजपनं समर्थन दिलेल्या शेतकरी आघाडीला पराभवाचा सामना करावा लागला. त्यांना केवळ सहा जागा जिंकता आल्या. तर महाविकास विकास आघाडीनं पाठिंबा दिलेल्या पॅनलला मोठे यश मिळाले आहे. बारा जागांवर विजय मिळवत बाजार समितीची सत्ता त्यांनी काबीज केली आहे.

पोभुर्णा येथील पराभव मुनगंटीवार यांच्यासाठी मोठा धक्का असल्याच बोललं जातं आहे.



चंद्रपूर जिल्ह्यातील १२ बाजार समितीसाठी निवडणूका पार पडल्या. नऊ बाजार समितींचा निकाल शनिवारी जाहीर झाला होता. यात चार बाजार समितीवर काँग्रसने विजय मिळावला तर दोन बाजार समितीवर भाजपनं विजय मिळवला होता. दोन ठिकाणी भाजप-काँग्रेस युतीने विजय मिळवला होता.

### काँग्रेस नेते सुभाष धोटे यांना धक्का

**भाजपचा पाठिंबा असलेल्या पॅनलला केवळ सहा जागांवर विजय मिळवता आला आहे. राज्यातील काँग्रेसचे एकमेव खासदार बाळू धानोरकर यांना बाजार समितीच्या निवडणुकीत अपयश मिळालं होतं.आता मंत्री मुनगंटीवार यांच्या पाठीशी नेहमीच खंबीरपणे उभ असलेल्या पोंभुर्णा येथे मुनगंटीवार यांना मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, गोंडपिंपरी बाजार समितीत देखील मोठा उलटफेर पाहायला मिळाला आहे. गोंडपिंपरीमध्ये काँग्रेसच्या हातून बाजार समिती भाजपकडे गेली आहे. काँग्रेस नेते सुभाष धोटे यांना मोठा धक्का बसला आहे.**

आज जिल्हातील पोंभुर्णा, गोंडपिपरी, भद्रावती या तीन बाजार समितीची मतमोजणी झाली. पोंभुर्णा येथील निकाल धक्कादायक ठरला. मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे क्षेत्र असलेल्या पोंभुर्णा बाजार समितीत महाविकास आघाडीने घवघवीत यश मिळवलं आहे. महाविकास आघाडीनं पाठिंबा दिलेल्या पॅनलला बारा जागांवर विजय मिळाला.

# इथे गद्दारीला स्थान नाही!

## बाजार समिती निवडणूक निकालांवरून आदित्य ठाकरे कडाडले!



। मुंबई। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे निकाल जाहीर होताच या निकालावरून भविष्यातील राजकीय समिकरणांबद्दल अंदाज वर्तवले जात आहेत. राज्यातील 147 कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी पार पडलेल्या निवडणूकांचे निकाल शनिवारी समोर आले आहेत. या निवडणूकांमध्ये महाविकास आघाडीविरुद्ध शिवसेना- भाजप युती (BJP) अशी थेट लढत या निवडणुकीत पाहायला मिळाली.**

दरम्यान या निवडणूकीत धक्का बसलेल्यांमध्ये सत्ताधारी पक्षातील आमदार, खासदार आणि मंत्र्यांचा समावेश आहे.

दरम्यान राज्यभरातील या निकालावरून उद्धव ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी शिंदे गटाला टोला लगावला आहे. त्यांनी महाविकास आघाडीला या निवडणूकीत मोठं यश मिळाल्याचा दावा केला आहे.

### महाराष्ट्राने पुनश्च दाखवले

**आदित्य ठाकरेंनी बाजार समिती निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर ट्रीट केलं आहे. त्यांनी म्हटलं आहे की, कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत महाविकास आघाडीला दणदणीत यश प्राप्त झाले आहे. महाराष्ट्राने पुनश्च दाखवले की इथे गद्दारीला स्थान नाही आणि हेच आपल्याला येत्या लोकसभा, विधानसभा, महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीत दिसणार आहे.**

सोबतच इथे गद्दारीला स्थान नाही असेही म्हटले आहे. आदित्य ठाकरेंनी बाजार समिती निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर ट्रीट केलं आहे. त्यांनी म्हटलं आहे की, कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत महाविकास आघाडीला दणदणीत यश प्राप्त झाले आहे. महाराष्ट्राने पुनश्च दाखवले की इथे गद्दारीला स्थान नाही आणि हेच आपल्याला येत्या लोकसभा, विधानसभा, महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीत दिसणार आहे.

तर शिवसेना-भाजपला शेतकऱ्यांनी नाकारल्याचे चित्र पाहिला मिळत आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा सर्वात जास्त बाजार समित्यांवर झेंडा फडकला आहे.

ठाकरे गटाचे खासदार संजय राउत यांनी ट्टिट करत या निकालावर प्रतिक्रिया दिली आहे, "बाजार समिती निवडणुकीत शिवसेनेसह महविकास आघाडीस उत्तम यश मिळाले. गद्दार आमदारांचा शेतकरी मतदारांनी करेक्ट कार्यक्रम केलं. हेच महाराष्ट्राचे जनमानस आहे. ही सुरुवात आहे.

महानगर पालिका,विधानसभा, लोकसभा निवडणुकीत असाच जोरदार कार्यक्रम होईल.लोकांनी खोके लाथाडले. हे स्पष्ट दिसते. हिम्मत असेल तर महानगर पालिका निवडणुका घेऊन दाखवा!"

# 'कोकणाची वाट लावू नका'

### बारसू रिफायनरी प्रकरणात प्रकाश आंबेडकरांची उडी, मुख्यमंत्र्यांना केलं आवाहन

।सांगली । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

कोकणातील राजापूर तालुक्यातील बारसू, सोलगाव परिसरात क्रूड ऑईल रिफायनींग करण्यासाठी रत्नागिरी रिफायनरी आणि पेट्रोलियम उद्योग ही रिफायनरी प्रस्तावित आहे. या रिफायनरीच्या प्रकल्पासाठी सोमवारपासून माती परीक्षण करण्याची सुरुवात झालीये.

स्थानिक गावकऱ्यांनी या प्रकल्पाला (BARSU REFINERY PROJECT) जोरदार विरोध केलाय. माती परीक्षणावरुन स्थानिक आणि पोलिसांमध्ये गेल्या दोन दिवसांपासून वाद सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, या प्रकरणात आता वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर (PRAKASH AMBEDKAR) यांनी उडी घेतली आहे.

कोकणातील बारसू रिफायनरीला आमचा विरोध आहे. एन्रॉनला घालवण्यातही आमची मोठी भूमिका होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना (EKNATH SHINDE) माझं आवाहन आहे की, कोकणाची वाट लावू नका. कोकणात आजही 95 टक्के शुध्द ऑक्सिजन आहे. इथलं वातावरण अत्यंत शुद्ध असल्यामुळं मोठ्या प्रमाणात वनस्पती व प्राणी इथं नव्यानं जन्माला येतात. त्यामुळं ही शुद्धता तशीच टिकली पाहिजे, असं प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलंय.

आंबेडकर पुढं म्हणाले, 'राहिला कोकणातील लोकांच्या जगण्याचा प्रश्न, तर मी सर्वांना आठवण करून देईन की, अंतुले मुख्यमंत्री झाले, तेव्हा त्यांनी म्हटलं होतं की, पूर्ण वेळ मिळाला तर मी कोकणचा कॅलिफोर्निया करू शकतो. ते खोटं नव्हतं. परंतु, जेव्हा त्यांनी हा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांचं मुख्यमंत्रीपद घालवण्यात आलं.'

# विरोधकांच्या एकजुटीची नांदी बिहारमधून?

## कर्नाटक निवडणुकीनंतर बैठकीचे संकेत

। नवी दिल्ली महाईन्यूज ।

**कर्नाटक विधानसभा निवडणुकीनंतर पाटणा येथे विरोधी पक्षांच्या नेत्यांची बैठक होण्याची शक्यता असल्याचे संकेत बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी शनिवारी दिले. संयुक्त जनता दलाचे (जदयू) प्रमुख असलेल्या नितीश कुमार यांनी सांगितले की, या बैठकीत विरोधी पक्षांच्या एकजुटीच्या मुद्द्यावर चर्चा होण्याची शक्यता आहे.**






या बैठकीच्या निमित्ताने आम्ही नक्कीच एकत्र येऊ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचा समर्थपणे मुकाबला करण्यासाठी विरोधी पक्षांच्या एकजुटीच्या मुद्द्यावर चर्चा करू.

नितीशकुमार यांनी सांगितले, की सध्या काही नेते कर्नाटक विधानसभा निवडणूक प्रचारात गुंतले आहेत. या निवडणुकीनंतर आम्ही आमच्या बैठकीचे ठिकाण निश्चित करू. विरोधी पक्षनेत्यांच्या पुढील बैठकीसाठी एकमताने पाटणा हे स्थळ निवडले तर ही बैठक येथेच होईल. येथे ही बैठक आयोजित करताना आम्हाला आनंदच होईल. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी २४ एप्रिल रोजी कोलकाता येथे नितीशकुमार आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांची भेट घेतली होती. यावेळी ममतांनी नितीश यांना आगामी लोकसभा निवडणुकीसाठी विरोधी ऐक्याबाबत चर्चा करण्यासाठी पाटणा येथे सर्व भाजपेतर पक्षांची बैठक आयोजित करण्याचे आवाहन केले. ममता यांनी सांगितले, की मी नितीश कुमार यांना एकच विनंती केली आहे. जयप्रकाशजींच्या आंदोलनाची सुरुवात बिहारमधून झाली होती. अशा बिहारमध्ये सर्वपक्षीय बैठक झाली तर आगामी वाटचालीची दिशा आपण निश्चित करू शकतो.

नितीश कुमार म्हणाले की, ममता यांनी पाटण्यात बैठक व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. आम्ही भाजपप्रणित केंद्र सरकारच्या विरोधात देशातील अधिकाधिक पक्षांना एकत्र करण्याचा प्रयत्न करत आहोत. मी अलीकडेच अनेक भाजपविरोधी पक्षांच्या नेत्यांना भेटलो. इतरही काही पक्षांशी मी चर्चा करणार आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी विरोधी पक्षांची एकजूट घडवून आणण्याचे माझे ध्येय आहे.

### लालूप्रसाद-नितीशकुमार चर्चा

**पाटणा : बिहारचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालूप्रसाद यादव सात महिन्यांनंतर बिहारमध्ये पाटण्याला परतले. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी त्यांची भेट घेतली. पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजपशी दोन हात करण्यासाठी हे दोन्ही नेते हातात हात घालून काम करणार असून, विरोधकांची आघाडी करण्यासाठीही प्रयत्न करणार आहेत. लालूप्रसाद यांचे पाटण्यात आगमन झाल्यानंतर काही तासांनी शुक्रवारी सायंकाळी उशिरा नितीशकुमार लालूप्रसाद आणि माजी मुख्यमंत्री राबडीदेवी यांच्या निवासस्थानी गेले.**

---

## जाबमध्ये गॅस गळती दुर्घटनेत 11 जणांचा मृत्यू

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

पंजाबमधील लुधियानामध्ये रविवारी सकाळी मोठी दुर्घटना घडली. ग्यासपुरा परिसरात गॅस गळतीमध्ये ११ जणांचा मृत्यू झाला आहे. तर काही जणांची प्रकृती गंभीर असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर मृतांच्या आकड्यात वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासनाचे पथक घटनास्थळी दाखलं झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, 'गोयल मिल्क प्लांट' नावाच्या कारखान्यामध्ये गॅस गळती झाली आहे. या कारखान्यात बड्या कंपन्यांचे दुग्धजन्य पदार्थ स्टोअर केले जातात. त्यानंतर त्याचा पुढे पुरवठा केला जातो.

प्राथमिक माहितीनुसार दुग्धजन्य पदार्थ थंड करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या गॅसची गळती झाली आहे.

गॅस गळतीमुळे कारखान्यापासून 300 मीटर परिघात राहणाऱ्या लोकांना श्वास घेण्यास त्रास होत आहे. पोलीस सध्या कारखान्याजवळ असून गॅस गळतीचे कारण शोधले जात आहे. पोलिसांनी व्यवस्थापकांशीही संपर्क साधला आहे.



## महिला कुस्तीपटू लैंगिक छळ प्रकरण: "जंतरमंतरवर तुम्हाला न्याय मिळणार नाही"

### बृजभूषण सिंह यांचं विधान : 7 पीडित महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळाचा आरोप

।हेग ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (WFI) चे प्रमुख आणि भाजपा खासदार बृजभूषण शरण सिंह यांनी नवी दिल्लीत आंदोलन करणाऱ्या कुस्तीपटूंवर टीकास्र सोडलं आहे. जंतरमंतरवरून तुम्हाला न्याय मिळणार नाही, असे बृजभूषण सिंह यांनी रविवारी म्हटलं.**



विशेष म्हणजे सात पीडित महिला कुस्तीपटूंनी लैंगिक छळाचा आरोप केल्यानंतर दिल्ली पोलिसांनी बृजभूषण सिंह यांच्याविरोधात दोन गुन्हे दाखल केले आहेत.

यातील एक एफआयआर अल्पवयीन महिला कुस्तीपटूने दिलेल्या तक्रारीनुसार, पॉक्सो (बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा) कायद्यांतर्गत नोंदवण्यात आला आहेयावर प्रतिक्रिया देताना बृजभूषण सिंह म्हणाले, "हरियाणातील ९० टक्के खेळाडू आणि पालकांचा भारतीय कुस्ती महासंघावर विश्वास आहे. ज्या कुटुंबांनी आणि मुलींनी आरोप केले आहेत, ते सर्व एकाच आखाड्याशी संबंधित आहेत. त्या आखाड्याचे प्रमुख काँग्रेस खासदार दीपेंदर हुडा आहेत."

दिल्लीच्या जंतरमंतरवर आंदोलन करणाऱ्या कुस्तीपटूंना उद्देशून बृजभूषण सिंह म्हणाले, "तुम्हाला जंतरमंतरवर आंदोलन करून न्याय मिळणार नाही. तुम्हाला न्याय हवा असेल, तर पोलीस ठाणे किंवा न्यायालयात जावं लागेल. ते (आंदोलनकर्ते कुस्तीपटू) आजपर्यंत पोलीस ठाण्यात किंवा न्यायालयात कधीही गेले नाहीत. न्यायालय जो निर्णय देईल, तो मला मान्य असेल."

एक दिवस आधी बृजभूषण सिंह यांनी कोणत्याही प्रकारच्या चौकशीला सामोरं जाण्याची तयारी असल्याचं म्हटलं होतं. यावेळी ते म्हणाले, "मी पूर्णपणे निर्दोष आहे. सर्वोच्च न्यायालय आणि दिल्ली पोलिसांवर माझा पूर्ण विश्वास आहे. मी कोणत्याही प्रकारच्या तपासाला सामोरे जाण्यास तयार आहे. भारतीय कुस्ती महासंघाच्या (WFI) अध्यक्षपदाचा राजीनामा देणं माझ्यासाठी मोठी गोष्ट नाही, परंतु मी गुन्हेगार म्हणून राजीनामा देणार नाही."

# सोनाली पुणेकरांना दिली गुड न्यूज..

अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हे मनोरंजन विश्वातील एक महत्वाचं नाव. गेली काही दिवस ती सातत्याने चर्चेत आहे. मग तिचे लग्न असो, हनीमून असो किंवा वैयक्तिक आयुष्यातील घडामोडी. ती कायमच चाहत्यांशी जोडली गेलेली असते.

मध्यंतरी तिचा 'तमाशा लाईव्ह' चित्रपट येऊन गेला, तर लवकरच ती 'महाराणी ताराराणी' यांच्या चरित्रावर चित्रपट करणार आहे. सोनाली सोशल मीडियावर सक्रिय असून बऱ्याचदा अनेक फोटो, व्हिडिओ शेयर करत असते.

आज मात्र या महाराष्ट्राच्या अप्सराने एक खास घोषणा केली आहे. खरतर ही पुणेकरांची मोठी आनंदाची बातमी आहे. पण सबंध मनोरंजन विश्वासाठीच ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे. त्यामुळे सोनालीने शेयर केलेला व्हिडिओ व्हायरल होत आहे.सोनालीने एक व्हिडिओ शेयर केला आहे. ज्यामध्ये ती अत्यंत पारंपरिक लुकमध्ये दिसत आहे. यावेळी ती या आलीशान रंगमंचावर उभी आहे. एखाद्या भव्य दिव्य ओपेरा हाऊस सारखी रचना असलेले हे सभागृह सोनालीच्या व्हिडिओ मध्ये दिसत आहे.

सुरवातीला सोनाली परदेशी आहे का किंवा कुठे बाहेरच्या देशातील थिएटर मधून आपल्याची बोलतेय का असा भास होतो. पण हे कोणतंही परदेशातल नाट्यगृह नसून सोनाली चक्क पुण्यातील निगडी येथील एका नाट्यगृहात उभी आहे. सोबतच या नाट्यगृहाची खासियत सांगितली आहे.पुण्यातील निगडी मध्ये ग. दि. माडगूळकर यांच्या नावाने एक भव्य दिव्य अत्याधुनिक आलीशान असे नाट्यगृह निगडी प्राधिकरणाने उभारले आहे. लवकरच हे नाट्यगृह प्रेक्षकांसाठी खुले होणार असून दर्जेदार कलाकृतींचा आस्वाद आणि सुसज्ज नाट्यगृह पुणेकरांना अनुभवता येणार आहे.

सोनाली स्वतः निगडीची असल्याने तिने अत्यंत आपुलकीने तिने हा व्हिडिओ शेयर केला आहे. सोबतच कशा पद्धतीने अवधूत गुप्ते, महेश काळे, प्रशांत दामले या दिग्गजांनी या नाट्य गृहाच्या उभारणीत मार्गदर्शन केले, याबद्दल सांगितले आहे.

विशेष म्हणजे या नाट्यगृहात कलाकारांच्या राहण्याची आणि उत्तम जेवणाची सोय देखील असणार आहे. त्यामुळे हे नाट्यगृह कलाकारांसाठीही एक पर्वणी असणार आहे.



# हा माझा पहिला चित्रपट आणि तिचा प्रतिसाद...”

दिग्दर्शक केदार शिंदे यांचा बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित ‘महाराष्ट्र शाहीर’ चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला. कृष्णराव गणपतराव साबळे उर्फ शाहीर साबळे यांच्या आयुष्यावर आधारित हा चित्रपट आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. या चित्रपटात शाहीरांची भूमिका अंकुश चौधरीने साकारली आहे. तर या चित्रपटात सना शिंदे ही शाहीर साबळे यांच्या पहिल्या पत्नी भानुमती यांची भूमिका साकारताना दिसत आहे. नुकतंच सना शिंदेने या चित्रपटाबद्दल केलेल्या पोस्टने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

सना शिंदे ही सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. नुकतंच तिने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. यात सना ही तिच्या पणजीबरोबर फोटो काढताना दिसत आहे. त्यावेळी अंकुश चौधरी आणि केदार शिंदेही तिथे



उपस्थित असल्याचे दिसत आहे.दरम्यान ‘महाराष्ट्र शाहीर’ चित्रपटात सना शिंदे, अभिनेत्री अश्विनी महांगडे, निर्मिती सावंत यांसह अनेक कलाकार हे महत्त्वपूर्ण भूमिकेत पाहायला मिळत आहे. या चित्रपटाच्या संगीताची धुरा अजय-अतुल यांनी सांभाळली आहे. शुक्रवारी २८ एप्रिल २०२३ रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित झाला.

# “मला त्याचा पश्चाताप...”

अभिनेत्री दीपिका पदुकोण व अभिनेता रणबीर कपूर एकेकाळी रिलेशनशीपमध्ये होते. दोघांच्या प्रेमाच्या सगळीकडे चर्चा होत्या व ते लग्नही करतील, असं म्हटलं जात होतं. दीपिकाने तर रणवीरसाठी तिच्या मानेवर टॅटूही काढला होता. पण अचानक दोघांच्या ब्रेकअपची बातमी आली होती. त्यानंतर दीपिकाने रणवीर सिंगशी लग्नगाठ बांधली, तर रणबीर कपूरने आलिया भट्टशी लग्न केलं.रणबीर व दीपिका आयुष्यात बरेच पुढे निघून गेले आहेत, पण तिच्या मानेवर तिने रणबीरसाठी काढलेल्या टॅटूची चर्चा आजही होत असते. तिने तिच्या मानेवर ‘RK’ लिहून घेतलं होतं. एकदा ‘कॉफी विथ करण’च्या तिसऱ्या पर्वात तिने हजेरी लावली होती. त्यावेळी तिला या टॅटूबद्दल विचारण्यात आलं होतं. त्यावेळी तिने खुलासा केला होता की तिला तिच्या निर्णयाचा



पश्चाताप झाला नाही.

ती म्हणाली होती, “हे असं काहीतरी आहे, जे मला त्यावेळी योग्य वाटलं होतं आणि मला कधीच पश्चाताप झाला नाही आणि मी तो टॅटू काढून टाकण्याचा कधीही विचार केला नाही. मला माहीत आहे की मीडिया सतत म्हणत आहे मी तो टॅटू काढला आहे. पण तो तसाच आहे आणि तो टॅटू हटवण्याचा माझा कोणताही प्लॅन नाही.”दरम्यान, रणबीर कपूर सध्या ‘ॲनिमल’ चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहेत, तर दीपिका देखील तिच्या आगामी प्रोजेक्ट्सचे शूटिंग करत आहे.

# फक्त स्वप्नं रंगवलं होतं आणि आज... नम्रता संभेराव

गेल्या काही वर्षात सोनी मराठी वाहिनीवर 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या मालिकेने अक्षरशः महाराष्ट्राला वेड लावले आहे. या कार्यक्रमातील एक अविभाज्य घटक म्हणजे 'नम्रता संभेराव'.

तिनं साकारलेली 'लॉली' असो, 'आई' असो किंवा नुकतेच सर्वांसमोर आलेले 'पावली' हे पात्र असो. तिच्या प्रत्येक भूमिकेनं आपल्याला हसवलं आहे. ती सोशल मीडियावर बरीच सक्रिय असते. सतत आपल्या चाहत्यांच्या संपर्कात राहत असते.

मध्यंतरी तिने आपल्या अमेरिका दौऱ्या विषयी एक भावनिक पोस्ट शेयर केली होती. ज्यामध्ये तिने तिच्या बाळाला सोडून जाताना कसं वाटतंय त्याबद्दल लिहिलं होतं. पण आज तिने थेट अमेरिकेतून पोस्ट शेयर केली आहे. तिच्या या पोस्टने सगळ्यांचेच लक्ष वेधले आहे.गेल्या वर्षी 'कुर्रर्र' हे नाटक आपल्या भेटीला आलं. सध्या या नाटकाची बरीच चर्चा आहे. या नाटकाचे लेखन दिग्दर्शन प्रसाद खांडेकरनेच केलं असून विशाखा सुभेदार या नाटकाची निर्माती आहे. सध्या या नाटकाचे महाराष्ट्रभर दौरे सुरू आहेत.

विशेष म्हणजे सध्या या नाटकाचा विदेश दौरा सुरू असून या नाटकाची संपूर्ण टीम अमेरिकेमध्ये गेली आहे. यावेळी नम्रतासोबत विशाखा सुभेदार, प्रसाद खांडेकर आणि पंढरीनाथ कांबळे देखील आहे. जवळपास एका महिन्याचा हा दौरा आहे. यामध्ये नाटकसोबतच ते मनसोक्त फिरणार देखील आहे.

अशीच भटकंती करतानाच एक फोटो नम्रताने शेयर केला आहे. आणि सोबत एक भन्नाट कॅप्शन दिले आहे.

होण्याचा उत्साह शब्दांत वर्णन करण्यापलीकडचा आहे..) फक्त स्वप्नं रंगवलं होतं अमेरिकेत जाण्याचं, पण इथे येऊन मनोरंजन करायला मिळतंय आणि मुबलक फिरायला देखील मिळतंय.. विशाखा ताई THANK YOU SO MUCH (तुझे खूप खूप आभार..) माझं अनेक स्वप्नांपैकी हे एक स्वप्न पूर्ण करण्याबद्दल"

अशी पोस्ट नम्रताने केली आहे. ही पोस्ट विशाखा सुभेदारसाठी तिने लिहिली आहे. विशाखा या नाटकाची निर्माती असल्याने तिच्यामुळे हा दौरा शक्य झाला. म्हणून नम्रताने कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ही पोस्ट लिहिली आहे.



# मुंबईचा राजस्थानवर 6 गडी राखून विजय!

## यशस्वी जैस्वालचे वादळी शतक ठरले व्यर्थ

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**३ धावांवर बाद झाल्यानंतर पॅव्हेलियनमध्ये परतला. इशान किशनलाही मोठी खेळी करता आली नाही. तो २८ धावा करून बाद झाला. यानंतर कॅमेरून ग्रीनने शानदार खेळी खेळली, मात्र त्याचे अर्धशतक हुकले. कॅमेरून ग्रीन ४४ धावांवर बाद झाला. सूर्याची बॅट जोरात तळपली. त्याने २९ चेंडूत ८ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने सर्वाधिक ५५ धावा केल्या आणि संघाला विजयाच्या जवळ नेले.**

यानंतर टीम डेव्हिड आणि तिलक वर्मा यांनी शानदार खेळी करत संघाला विजय मिळवून दिला. तिलक वर्माने ३ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने नाबाद २९ धावा केल्या, तर टीम डेव्हिडने १४ चेंडूत २ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने नाबाद ४५ धावा केल्या. टीम डेव्हिडने शेवटच्या षटकात सलग तीन षटकार लगावत मुंबईला विजय मिळवून दिला. राजस्थानकडून आर आश्विनने दोन विकेट घेतल्या. त्याचबरोबर बोल्ट आणि संदीपने प्रत्येकी १-१ विकेट घेतली.

यानंतर देवदत्त पडिक्कललाही मोठी खेळी करता आली नाही. तो केवळ दोन धावा काढून बाद झाला. जेसन होल्डरलाही मोठी खेळी करता आली नाही. होल्डर एका षटकाराच्या मदतीने ११ धावा करून बाद झाला. शिमरॉन हेटमायरलाही मैदानावर फार काळ तग धरता आला नाही. तो केवळ ८ धावा करून बाद झाला. ध्रुव जुरेललाही कमाल दाखवता आली नाही. तो अवघ्या २ धावांवर बाद झाला. मुंबईच्या अर्शद खानने सर्वाधिक तीन बळी घेतले.



### यशस्वीने शतक झळकावले

» नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेल्या राजस्थानने चांगली सुरुवात केली. संघाने २० षटकांत ७ गडी गमावून २१२ धावा केल्या. यशस्वी जैस्वाल आणि जोस बटलर यांच्यात चांगली भागीदारी. यशस्वी जैस्वालने शतक झळकावले. यासह चालू मोसमात शतक ठोकणारा तो तिसरा फलंदाज ठरला. यशस्वीने ६२ चेंडूत १६ चौकार आणि ८ षटकारांच्या मदतीने १२४ धावा केल्या. जोस बटलर १८ धावांवर बाद झाला. कर्णधार संजू सॅमसनलाही मोठी खेळी खेळता आली नाही. तो १४ धावा काढून बाद झाला.



---

# एकटा टायगर! वानखेडे मैदानात मुंबई इंडियन्सविरोधात जैस्वालची 'यशस्वी' खेळी

## आयपीएलमध्ये ठोकलं पहिलं शतक

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**वा सामना मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात होत आहे. राजस्थानने प्रथम फलंदाजी करत मुंबईच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. राजस्थानचे इतर फलंदाज धावांसाठी संघर्ष करत असतानाच यशस्वी जैस्वालने वादळी खेळी करून आयपीएल करिअरमधील पहिलं शतक ठोकलं आहे. मागील काही सामन्यात जैस्वालने अप्रतिम फलंदाजी करून जलवा दाखवला होता. पण आजच्या सामन्यात शतक ठोकून कमाल केली. जैस्वालने ६२ चेंडूत ८ षटकार आणि १६ चौकारांच्या मदतीनं १२४ धावांची शतकी खेळी साकारली.**

**आयपीएल २०२३ चा ४२**

राजस्थान रॉयल्ससाठी यशस्वी जैस्वाल आणि जॉस बटलर सलामीला फलंदाजीसाठी मैदानात उतरला. एरव्ही धडाकेबाज फलंदाजी करणारा बटलर आजच्या सामन्यात धावांसाठी संघर्ष करताना दिसला. पीयुष चावलाच्या गोलंदाजीवर बटलर १८ धावांवर बाद झाला. पण त्यानंतर यशस्वी जैस्वालने वानखेडे मैदानात धावांचा पाऊस पाडला. मैदानात चारही दिशेला मोठे फटके मारून जैस्वालन मुंबईच्या गोलंदाजांचा समाचार घेतला.

सऱ्या एंडला राजस्थानचे एकापाठोपाठ एक विकेट जात असताना दुसरीकडे मात्र जैस्वाल धावांची गती वाढवत होता. ६२ चेंडूत १२४ धावांवर खेळत असताना शेवटच्या षटकात अर्शद खानने जैस्वालला झेलबाद केलं. त्यामुळे राजस्थानने २० षटकांत ७ विकेट्स गमावत २१२ धावांपर्यंत मजल मारली. मुंबई इंडियन्सला विजयासाठी २१३ धावांचं लक्ष्य गाठावं लागणार आहे.



## सात्विक-चिरागची 'सुवर्ण' कामगिरी

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टीने आज रविवारी बॅडमिंटन आशिया चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला आहे. अशी सुवर्ण कामगिरी करणारी चिराग-सात्विकची जोडी भारतातील पहिली ठरली आहे. गतवर्षीही या जोडीने राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक आणि वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक जिंकलं होतं. दुबईत खेळवण्यात आलेल्या अंतिम सामन्यात ओंग यू सिन आणि टियो ई या मलेशियाच्या जोडीचा ६७ मिनिटांत १६-२१,२१-१७,२१-१९ ने पराभव केला. १९७१ ला दिपू घोष आणि रमन घोष यांनी या स्पर्धेत कांस्यपदक जिंकलं होतं.

केवळ 'आयपीएल'मुळे पुनरागमन नाही!

रहाणेने गेल्या रणजी हंगामात मुंबईकडून सात सामन्यांत ६३४ धावा केल्या होत्या. यात एका द्विशतकाचाही समावेश होता. त्यामुळे रहाणेची केवळ 'आयपीएल'मधील काही सामन्यांच्या आधारे भारतीय संघात निवड झाली असे म्हणणे चुकीचे ठरेल, असे शास्त्री यांना वाटते. "रहाणेने 'आयपीएल'च्या तीन सामन्यांत चमक दाखवली आणि त्याचे भारतीय संघात पुनरागमन झाले असे काही लोकांना वाटत आहे.

